| MHBI110001582026 | **<u>दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३७/२०२६</u>**<br>**<u>मधील नि.क्र.०१ खालील आदेश</u>** |
|---|---|

१]	अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज वारसा दाखला मिळणेसाठी केलेला आहे. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२, ३ यांचे वडील मयत **केशव पि. नाथा घाडगे** हे दि.२५/०५/२०२४ रोजी चकलांबा, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले आहेत. अर्जदार क्र.१ ते ३ यांना शासकिय व निमशासकिय रेकॉर्डला मयताचे वारस म्हणुन वारसा आधारे नाव लावण्यासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार क्र.१ ते ३ यांनी **केशव पि. नाथा घाडगे** यांचे एकमेव कायदेशीर वारस असलेबाबत वारसा दाखला मिळणेकरीता अर्ज दाखल आहे.

२]	सदरकामी दि.२२/०१/२०२६ चे 'दै. समर्थ राजयोग' मध्ये जाहिरनामा प्रसिद्ध करुन सुद्धा सदर अर्जास कुणीही हरकत घेतलेली नाही. सबब, सदरचा अर्ज एकतर्फा चालविण्यात आला.

३]	अर्जाच्या अनुषंगाने खालील मुद्दे माझे विवेचनास उपस्थित होतात व मी त्यावरील निष्कर्ष त्या खाली नमूद कारणमिमांसावरुन नोंदवत आहे.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार क्र.१ ते ३ हे सिध्द करतात काय की, ते मयत **केशव पि. नाथा घाडगे** यांचे कायदेशीर वारस आहेत ? | होय |
| २ | अर्जदार क्र.१ ते ३ हे सिध्द करतात काय की, मयत **केशव पि. नाथा घाडगे** हे दि.२५/०५/२०२४ रोजी विना–मृत्युपत्र मयत झाले आहेत ? | होय |
| ३ | काय आदेश ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.15 17:39:33 +0530

<u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा नं.१ ते ३ करीता–</u>**

४] अर्जदार क्र.०२ यांनी त्यांचे मागणीचे पृष्ठयर्थ नि.क्र.८ ला पुराव्याचे शपथ पत्र दाखल केले आहे. त्यांनी त्यांचे शपथपत्रात अर्जातील कथनांचा पुर्नउच्चार केला आहे. अर्जदार यांनी **केशव पि. नाथा घाडगे** यांचे मृत्यूप्रमाणपत्र नि.क्र.६ वर दाखल केले आहे. अर्जदाराने नि.क्र.१२ ला जादा पुरावा देणेचा नाही अशी पुरशिस दाखल केली आहे.

५] प्रकरणातील दाखल कागदपत्रे, सत्यप्रतिज्ञापत्राचे अवलोकन करता असे निर्देशनास येते की, अर्जदार क्र.१ पत्नी व अर्जदार क्र.२, ३ अपत्ये या नात्याने मयत **केशव पि. नाथा घाडगे** यांचे कायदेशीर वारस आहेत. सबब मी मुद्दा क्र. १ व २ चे निष्कर्ष होकारार्थी देवुन मुद्दा क्र. ३ चे निष्कर्ष दाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. अर्जदार क्र.१ ते ३ हेच मयत **केशव पि. नाथा घाडगे** यांचे कायदेशीर वारस आहेत, असे जाहीर करण्यात येते.

३. अर्जदार क्र.१ ते ३ हेच मयत **केशव पि. नाथा घाडगे** यांचे वारस असलेने विहीत कारणासाठी वारस दाखला त्यांना विहीत न्यायशुल्क भरल्यानंतर प्रदान करणेत यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात पारीत व घोषीत.)

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.15 17:39:37 +0530

**गेवराई.** **(श्रुती ह. पाटील)**

**दि. १५/०४/२०२६** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**

**गेवराई.**

<u>**CERTIFICATE**</u>

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | :- | 15.04.2026 |
| Transcribed on | :- | 15.04.2026 |
| Checked & Signed on | :- | 15.04.2026 |

Sd/-
(P.B. Kusumkar)
Stenographer G-3, Georai.